Article related to youth fest achievement of podar.

Maharashtra times, 8th August, 2016



# पोदार, मिठीबाई, एसआयइएस अव्वल

दीपेश वेदक, कॉलेज क्लब रिपोर्टर

मुंबई विद्यापीठाच्या झोन एक, दोन व तीनच्या लिटररी आर्ट आणि फाइन आर्ट विभागाच्या प्राथमिक फेऱ्या गुरुवारी झाल्या. विविध १४ स्पर्धांच्या या फेरीमध्ये स्पर्धक कॉलेजांनी मोठी लढत दिली. झोन एक मधून पोदार कॉलेज, झोन दोन मधून एसआयईएस कॉलेज, तर झोन तीन मधून मिठीबाई कॉलेज अव्वल ठरले.

मुंबई विद्यापीठाच्या झोन एक धील २६, झोन दोन मधील ३१ आणि ोन तीन मधील ३६ कॉलेजांमध्ये रुवारी स्पर्धा रंगली. लिटररी आर्ट ाणि फाईन आर्ट विभागातील १४ पर्धांमध्ये उत्तमोत्तम कामगिरी करत धिकाधिक बक्षिसे मिळवणे, हेच कॉलेजचे ध्येय होते. १४पैकी ा स्पर्धांचे निकाल गुरुवारी जाहीर रण्यात आले. यामध्ये झोन एक मधून ठ बक्षिसे मिळवत पोदार कॉलेज, झोन दोन मधून पाच बक्षिसे मिळवत एसआयईएस कॉलेज, तर झोन तीन मधून सात बक्षिसे मिळवत मिठीबाई कॉलेज अव्वल ठरले. चार स्पर्धांचे निकाल राखून ठेवण्यात आले आहेत.

**आज ठरणार झोन एकचे शिलेदार**

मुंबई विद्यापीठाच्या झोन एकच्या डान्स, म्युझिक आणि थीएटर आर्ट विभागांची प्राथमिक फेरी माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये होणार आहे. आज, शनिवारी आणि रविवारी होणाऱ्या या प्राथमिक फेरीतून जास्तीत जास्त बक्षिसे मिळवण्याकडे या झोनमध्ये येणारी २६ कॉलेजे प्रयत्न करतील. पोदार कॉलेज, रुईया कॉलेज, रुपारेल कॉलेज, एम डी कॉलेज, आदी युवा महोत्सवात दर्जेदार सादरीकरण देणारी कॉलेजे या झोनमध्ये असल्याने या स्पर्धा प्रतिष्ठेच्या होतील.

**झोन एक**

पोदार कॉलेज ८
रुईया कॉलेज ६
जीएलसी ६
जेजे स्कुल ऑफ आर्ट ५
जेजे स्कुल ऑफ अपलाइड आर्ट ५

**झोन दोन**

एसआयइएस कॉलेज, सायन ५
सोमैया कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स ४

**झोन तीन**

मिठीबाई कॉलेज ७
डहाणूकर कॉलेज ३